# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापन तथा मान्सून पूर्व आढावा बैठक संपन्न**
- **पावसाळीपूर्व स्थितीचा आढावा घेताना मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कामे युद्धपातळीवर पूर्ण करून घेण्याचे मा. आयुक्त यांच्या सूचना**

दिनांक २२ एप्रिल २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भाप्रसे) यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापन तथा मान्सून पूर्व आढावा बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस अतिरिक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त (मुख्यालय) रवि पवार, उपायुक्त कल्पिता पिंपळे, उपायुक्त सचिन बांगर, शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता, सहा. आयुक्त प्रभाग समिती क्रमांक १ ते ६, महापालिका अधिकारी, कर्मचारी, वाहतूक पोलीस अधिकारी, नॅशनल हायवे प्रतिनिधी, महानगर गॅस प्रतिनिधी, जे कुमारचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मान्सून दरम्यान कोणत्याही आपत्कालीन घटना यावर्षी घडू नये यासाठी आधीपासूनच आवश्यक ती दक्षता घेत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर द्यावा असे निर्देश देत महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भाप्रसे) यांनी महानगरपालिका कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत सुरू असलेली कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी निर्देश दिले. मान्सून २०२४ पावसाळापूर्व तयारीच्या अनुषंगाने विविध प्राधिकरणांसोबत आयोजित शहर आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठकीप्रसंगी समितीचे अध्यक्ष म्हणून मा. आयुक्तांनी मिरा भाईंदर शहरातील सर्व प्राधिकरणांनी परस्पर समन्वय राखून नियोजन करावे व त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी करावी असे सूचित केले.

यामध्ये सध्या सुरू असलेल्या स्थापत्य विषयक कामांची स्थिती जाणून घेत ही कामे २४X७ तास सुरू ठेवून जलद गतीने व कामाची गुणवत्ता राखून कामे पूर्ण करावीत असे निर्देशित केले. रस्ते खड्डेमुक्त राहावेत याकडे काटेकोर लक्ष देण्याचे निर्देश देतानाच कुठल्याही परिस्थितीत रस्त्यावर खड्डा चालणार नाही याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश मा. आयुक्त यांनी दिले. मॅनहोल कव्हर व गटारांची साफसफाई करून त्यांच्यावरील तुटलेली झाकणे ही तातडीने बदलून घेण्याचे निर्देश दिले. गटार किंवा नाल्या शेजारील रस्त्यावरील डेब्रिज उचलणे व पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात बांधलेले गटारे साफ ठेवण्याचे निर्देशित करण्यात आले. तसेच शहरातील बांधकामे सुरू असलेल्या इमारतींची माहिती व इमारतीच्या चहूबाजूंनी सुरक्षेच्या दृष्टीने जाळ्या व इतर अपघात प्रतिबंधक उपाययोजना करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

रस्त्यावरील दिवाबत्ती सुव्यवस्थित राहील व विद्युत खांबामुळे कोणतीही दुर्घटना घडणार नाही याची खबरदारी घ्यावी. याकरिता प्रत्येक विद्युत खांबाची काळजीपूर्वक पाहणी करावी असे निर्देश देण्यात आले. वाहतुक पोलीस विभागामार्फत प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने पावसाळी काळात सिग्नल यंत्रणा नियमित कार्यान्वित राहील याकडे लक्ष द्यावे तसेच स्पीड ब्रेकर, झेब्रा क्रॉसींगच्या रंगरंगोटीचीही कामे आपापल्या अखत्यारितील रस्त्यांवर करून घ्यावीत असे सूचित करण्यात आले. सर्व पथदिवे सुरु राहतील याची खबरदारी घेण्याप्रमाणेच महावितरण कंपनीने उघड्या केबल, डिपीची झाकणे बंद

असण्याची खबरदारी घ्यावी व दुरुस्ती करून घ्यावी अशा सूचना देण्यात आल्या. तसेच एम.टी.एन.एल, एम.जी.एल ने केलेल्या खोदाई संदर्भातील माहिती घेऊन तातडीने उर्वरित कामे पूर्ण करून घेऊन रस्ते दुरुस्ती करून घ्यावी असे निर्देश दिले.

बंदिस्त नाले व नैसर्गिक नाले यांची सफाई विहित वेळेत पूर्ण करावी असे घनकचरा व्यवस्थापन विभागास निर्देश देण्यात आले. तसेच सफाईनंतर काठाशी काढून ठेवला जाणारा गाळ थोडासा सुकल्यानंतर लगेच उचलला जावा याबाबत खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे व तो कोणत्याही प्रकारे दूषीत होणार नाही याची काळजी घ्यावी असे सूचित करण्यात आले. तसेच आवश्यक एवढ्या ब्लिचिंग पावडरचा साठा करून ठेवणे व जल शुध्दीकरणकरीता आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मल:निसारण जलवाहिन्या आदी दुरुस्त करून त्यांची बारकाईने पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले. सर्व प्रभाग अधिकाऱ्यांनी धोकादायक इमारतींची पाहणी करून इमारतींचे वर्गीकरण करून त्यांची यादी जाहीर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच सदर यादी ही आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कृती आराखड्यामध्ये प्रसिद्ध करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

पावसाळी कालावधीतील संभाव्य आजार लक्षात घेता महानगरपालिकेकडे आवश्यक औषध साठा उपलब्ध करून ठेवणे तसेच संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आणि व्यापक जनजागृती करणेबाबत मा. आयुक्तांनी महत्वाच्या सूचना केल्या. आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन केंद्रातील यंत्र सामुग्रीसह यंत्रणा सुसज्ज व कार्यान्वित ठेवणेबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच शहरातील सर्व अग्निशमन केंद्रांच्या ठिकाणी मागील वर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा आपत्कालीन नियंत्रण कक्ष सुरू करून या सर्व ठिकाणी आवश्यक साधनसामुग्री व उपकरणांसह मदत करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध ठेवावे असे सूचित केले. रहदारीला अडथळा येणा-या झाडांच्या फांद्यांची आवश्यक तेवढ्याच प्रमाणात छाटणी करावी असे सूचित करतानाच त्याचा हरित कचरा त्वरित उचलण्यासाठी उद्यान व स्वच्छता निरीक्षकांनी परस्पर समन्वय राखावा असे निर्देश देण्यात आले.

मागील वर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा विभाग कार्यालयांमध्ये १ जून २०२४ पासून २४X७ आपत्कालीन कक्ष स्थापन करण्याच्या सूचना मा. आयुक्त यांनी दिल्या. दरड/घनमाती कोसळण्याची संभाव्य ठिकाणे तसेच नैसर्गिक नाल्यांची ठिकाणे येथील झोपड्या/घरे स्थलांतरीत करण्याची दक्षता घ्यावी अशा सूचना सर्व प्रभाग अधिकारी यांना देण्यात आल्या. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या निवाऱ्याकरीता आवश्यक शाळांमध्ये प्रभाग अधिकाऱ्यांनी पूर्वनियोजन करावे. तसेच महापालिका विभाग कार्यालयात आवश्यक साधनसामुग्री व उपकरणांसह मदत करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध ठेवावे असे मा. आयुक्तांनी सूचित केले. याशिवाय विभाग कार्यालयात असलेल्या रबर बोटी, पाणी उपसा पंप तसेच इतर साहित्य व उपकरणे कार्यान्वित असल्याबाबत तपासणी करून घ्यावी असेही निर्देश मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भाप्रसे) यांनी दिले.